॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Fax : (02462) 215572 **Centre for External Education** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215144 E-mail: decsrtmun@gmail.com

जा.क्र :स्वारातीमविनां/ब.शि.वि/२०२३–२४/१३५ दि.२५/०७/२०२३

## परिपत्रक

**विषय:— अंध व दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी प्रवेश शुल्क व परीक्षा शुल्क माफ करणे बाबतचे परिपत्रक.**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत बहिस्थ शिक्षण विभागातर्फे बहिस्थ शिक्षण प्रणाली अंतर्गत एम.ए. व एम.कॉम. अभ्यासक्रम राबविण्यात येतात. सदर अभ्यासक्रम विद्यापीठ परिक्षेत्रातील एकूण ८० अभ्यासकेंद्रावर कार्यान्वित आहे. शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ पासून बहिस्थ शिक्षण प्रणाली अंतर्गत एम.ए.व एम.कॉम. अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अंध व दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रवेश शुल्क व परीक्षा शुल्क माफ करणे बाबत मागणी करण्यात आली होती. सदर मागणीचा सकारात्मक विचार करता मा. कुलगुरू महोदय यांनी शुल्क माफीस मान्यता प्रदान केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ पासून पदव्युत्तर एम.ए. व एम.कॉम. बहिस्थ शिक्षण अभ्यासक्रमाअंतर्गत प्रवेश घेवू इच्छीणाऱ्या अंध व दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रवेश शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. त्यानुसार एम.ए. प्रथम व व्दितीय वर्षासाठी एकुण अभ्यासक्रम शुल्क (रू.६३१०/—) शुल्कापैकी रूपये २००० अभ्यासक्रम शुल्क व रू.८६०/— परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. व उर्वरित (रू.३४५०) शुल्काची रक्कम सदर विद्यार्थ्याकडून स्विकारण्यात यावी. तसेच एम.कॉम. प्रथम व व्दितीय वर्षाअंतर्गत एकुण अभ्यासक्रम शुल्क (रू.८५००/—) शुल्कापैकी रूपये २८०० अभ्यासक्रम शुल्क व रू.१५००/— परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. व उर्वरित (रू.४२००) शुल्काची रक्कम सदर विद्यार्थ्याकडून स्विकारण्यात यावी.

वरील प्रमाणे योग्यती कार्यवाही करून आपल्या अभ्यासकेंद्रावरील प्रवेशित अंध व दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रवेश, पात्रता व परीक्षा यादी बहिस्थ शिक्षण विभागास सादर करते वेळी दिव्यांग विद्यार्थ्यांचे अंध व दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असेल. सदर माहिती आवर्जुन निदर्शनास आणून देण्यात यावी ही नम्र विनंती.

संचालक
बहिस्थ शिक्षण विभाग
प्रस्तुत विद्यापीठ,